■ वर्ष- १० ■ अंक- ४३ ■ मुंबई, मंगळवार, १० सप्टेंबर ते १६ सप्टेंबर ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
खबरदार... विसर्जनानंतर गणेश मूर्तींचे फोटो काढाल तर पस्तावाल, पोलिसांचे आदेश काय

3 → साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

पूर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंगांना अधिक महत्त्व ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन होणार !

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे मुंबईतील बैठकीत आश्वासन - बाजीराव धर्माधिकारी

- **अमृत योजना कायम ठेवून येत्या कॅबिनेटमध्ये महामंडळाचा प्रश्न मार्गी लावणारः फडणवीस**
- **ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव धर्माधिकारी यांचा सातत्याने पाठपुरावा!**
- **धनंजय मुंडे यांनी सकारात्मक भूमिका घेत ब्राह्मण समाजाला आश्वासित केले होते!**



**बीड :** ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे ही मागणी लावून धरण्यात आलेली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवार (४सप्टेंबर) रोजी या संदभार्ने ब्राह्मण समाजाच्या शिष्टमंडळाची विशेष बैठक घेऊन चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून येत्या कॅबिनेटमध्ये आर्थिक विकास महामंडळाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. अशी माहिती ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे. त्याचप्रमाणे विविध ठिकाणी समाज बांधव उपोषणाला बसले होते. त्यावेळीही` वेळोवेळीही धनंजय मुंडे यांनी सकारात्मक भूमिका घेत ब्राह्मण समाजाला आश्वासित केले होते. तीच भूमिका पार पाडत सरकारच्या स्तरावर हा प्रश्न सोड समाजस्ता और धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून ब्राह्मण समाज शिष्टमंडळाची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ची बैठक ठरवण्यात आली. या बैठकीत देवेंद्र फडणवीसयांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळाने समाजाच्या इतर मागण्यांही उपमुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा ! परळी येथे झालेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेतील मुख्य ठराव म्हणून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी एकजुटीने मागणी करण्यात आली होती.

या अनुषंगाने राज्यात समाज बांधवांच्या वतीने विविध स्तरावर आंदोलने, निवेदने व आपापल्या स्तरावरून शासन दरबारी पाठपुरावा केला गेला. परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐक्य परिषदेत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सरकारच्या वतीने सकल ब्राह्मण समाजाला याबाबत समन्वयक म्हणून आपण भूमिका पार पाडू असा शब्द दिला होता. त्या अनुषंगाने सरकार दरबारी याबाबतचा पाठपुरावा सुरू होता. ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव धर्माधिकारी यांनी सातत्याने सरकार दरबारी याबाबत पाठपुरावा केला. शिष्टमंडळात जिल्ह्यातील समाजबाधवाचा सहभाग शिष्टमंडळात जिल्ह्यातील समाजबांधवांचा सहभाग या शिष्टमंडळात ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी, वैजनाथ, अजिंक्यपांडव, शैलेश कुलकर्णी, विश्वजीत देशपांडे, मनोज जोशी , सचिन वाडे पाटी, संभाजीनगर, महेशदोरवट पाटील, संभाजीनगर, काकासाहेबकुलकर्णी, सोलापूर, संजय कुलकर्णी सुपेकर, गंगाखेड, रमण उपाध्याय, जालना, डॉ. संजीवनी पांडे, मुंबई, विजया कुलकर्णी, संभाजीनग सूर्यकांत देशमुख, बार्शी, शशांक खेर, डोंबिवली, आलोक चौधरी- सेलू. सौ . धनश्रीताई उत्पात यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

## गुरु नेहमीच शिष्याच्या उज्वल भविष्याचा विचार करत असतो-आमदार सत्यजित तांबे

















**सिन्नरः-** विद्यार्थ्यांनी नेहमीच गुरु शिष्याच्या उज्वल परंपरेची जोपासना करावी, व आयुष्यभर गुरु विषयक कृतज्ञता जोपासावी. गुरुने दिलेला सल्ला विद्यार्थ्यांनी अमलात आणला तर त्याच्या आयुष्याचे नेहमी सोने होते. मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेच्या गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला व भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर तसेच सोशल राइट्स फाउंडेशन ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक श्रीकृष्णाजी भगत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांनी केले. गुरु हा परिसापलीकडचा असतो तो नेहमीच विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे सोने व्हावे व त्याच्या कल्याणाचा विचार करत असतो असे प्रास्ताविकात मांडले. आश्रय फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिपक नाईक यांनी त्यांच्या राईट सोशल फाउंडेशन विद्यार्थ्यांसाठी कार्य करते विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंद जर झाला तर त्याचे आयुष्य बरबाद होते, विद्यार्थ्याकडून छोटी मोठी चूक झाली असेल तर त्याच्या गुन्हा नोंदवण्या अगोदर शहानिशा करण्याचे काम संपूर्ण महाराष्ट्रभर सोशल राइट फाउंडेशन करते माहिती यावेळी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री कृष्णाजी भगत यांनी विद्यार्थ्यांवर त्यांचे आई-वडील व संस्कारक्षम वयात भेटलेल्या गुरुजनांचा विद्यार्थ्यांनी आदर करावा, तसेच आधुनिक काळात विद्यार्थी व गुरुजनांनी शैक्षणिक क्षेत्राची पावित्र्यता राखावी. शिष्याने आपल्या आई-वडिलांची मान आपल्या गैर कृत्यामुळे कोणापुढेही झुकू देऊ नये असे आवाहन याप्रसंगी केले. राईट सोशल फाउंडेशनच्या वतीने यावेळी संपूर्ण शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. वेदिका देशमुख या विद्यार्थिनीने आमदार सत्यजित तांबे यांचे हुबेहूब स्केच तयार करून त्यांना याप्रसंगी भेट दिले. यावेळी व्यासपीठावर डॉ. गुरुप्रसाद नाईक उपसचिव असे ट्रस्ट ठाणे, सौ. प्रीती नाईक संस्थापक सचिव आश्रय ट्रस्ट ठाणे, डॉ. प्रकाश पांगम ,डॉ. आर. डी नायकवाडी आश्रय संस्थेने यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात प्रा. संजय पेखळे, प्रा. अरुण पोटे,डॉ. चांगदेव गुरुळे, डॉ. दिपाली सूर्यवंशी, प्रा. रामदास सोनवणे, डॉ. सुरेश इंगळे यांना प्रदान केले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने प्रा. जावेद शेख व संगीत कक्षाच्या विद्यार्थ्यांनी केली. सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रेय वेलजाळी, तर आभार प्रा. आर. एम. आंबेकर यांनी केले.

## नो ब्रोकर साईट वरून ९ लाख ५० हजाराची फसवणूक केलेल्या सराईताना पोलिसांनी केली अटक



दि. १८.०८.२०२४ हिना अब्दुल सलमानी, वय - ३६ वर्ष, व्यवसाय - गृहीणी, रा. टयु लिप बिल्डींग, ए विंग, रुम नं. २०४, गौरव व्हॅली, १५ नंबर जवळ, मिरारोड पुर्व ठाणे यांना मिरा रोड येथे हेवि डिपोझिटवर फ्लॅट भाड्याने पाहिजे होता. नो ब्रोकर या वेबसाईटर फ्लॅट सर्चे करत असतांना त्यांना मिरा रोड येथील एक फ्लॅट आवडल्याने त्यांनी इस्टेट एजंट कुणाल सिंग यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर फोन कॉल केला इस्टेट एजंट कुणाल सिंग यांनी त्याचा मित्र इस्टेट एजंट शाहरुख अहमद यांचा मोबाईल नंबर दिला हिना अब्दुल सलमानी, यांनी शाहरुख यांना फोन केला त्यानंतर इस्टेट एंजट शाहरुख हे तक्रारदार यांना भेटले शाहरुख यांनी लक्ष्मी पॅराडाईज बिल्डींग, रुम नं. ०५ ए विंग, भैरव रेसिडन्सीजवळ, कनकिया, मिरारोड पुर्व हा फ्लॅट दाखविला. त्यांच्या सोबत एक इसम हा सदर फ्लॅटचा मालक असल्याचे त्यांनी सांगितले हिना अब्दुल सलमानी, यांना फ्लॅट आवडल्याने त्यांनी रुम मालक यांच्या सोबत हेवि डिपोझिटचे एग्रीमेंट तयार केले व रुम मालक यांना ९,५०,०००/रुपये दिले होते. दिनांक २२.०८.२०२४ रोजी हिना सलमानी, यांनी रुमचा ताबा मिळण्याकरिता इस्टेट इंजट व रुम मालक यांना फोन केला असता त्यांचे फोन बंद आले त्यांनी सदर सोसायटीमध्ये जावुन शाहनिशा केली असता सदर इसम हे बनावट इस्टेट इजंट व तोतया मालक असल्याचे त्यांना समजले त्यांनी सदर घडलेल्या प्रकारची शाहनिशा केली असता त्यांची फसवणुक झाली असल्याची त्यांची खात्री झाली त्यांनी दिनांक ०५.०९.२०२४ रोजी बनावट इस्टेट इजंट व तोतया रुम मालक यांच्या विरुद्ध काशिगांव पोलिस स्टेशन गुन्हा नोंद केला असून नमुद गुन्ह्याचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे हे करत आहे.

नमुद गुन्ह्यात फियार्दी यांचा विश्वास संपादन करुण त्यांची फसवणुक झालेली रक्कम घेवुन बनावट इस्टेट इजंट व तोतया मालक हे फरार झाल्याने त्यांचा शोध घेवुन त्यांना अटक करण्याच्या सुचना वरिष्ठ पोलिस अधिकारी यांनी दिल्या होत्या त्या प्रमाणे नमुद गुन्ह्याच्या तपासात गुन्हेगारांच्या मोबाईल तांत्रिक विश्लेषणातुन नमुद गुन्ह्यात आरोपी नामे १) शाहरुख नियाज अहमद, वय- २८ वर्ष, व्यवसाय - इस्टेट एजंट, रा. रुम नं. ३०१, स्काय लाईन बिल्डींग नं. बालाजी हॉटेलजवळ, शांतीपार्क, मिरारोड पुर्व. २) आफताफ मोहनुजमा आलम, वय - ४५ वर्ष, रा. रुम नं. ३०३ बिल्डींग नं. ३, मंथन गौरव संकल्प फेज - ४, बेवर्ली पार्क, मिरारोड पुर्व ३) रमेश गिसीअवन शर्मा, वय - ३७ वर्ष, रा. आय विंग रुम नं.४०३, गौरव रेसिडन्सी फेज - १, सीएनजी पेट्रोलपंपजवळ, बेवर्ली पार्क, मिरारोड पुर्व यांना अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीतांकडून हिना अब्दुल सलमानी यांची रक्कम हस्तगत करण्यात आली असुन अटक आरोपी शाहरुख अहमद व अफताफ आलम हे साराईत गुन्हेगार असुन त्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल झाले आहे.

तरी मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तलया तर्फे नागरिकांना अवाहाण करण्यात येते कि,फ्लॅट भाड्याने, हेवि डिपोझिटवर अथवा खरेदी विक्रीचा व्यवहार करण्या पुर्वी इस्टेट इजंट व रुम मालक यांची खात्री करुण त्या फ्लॅटची शाहनिशा करुण व्यवहार केला पाहिजे गेल्या अनेक दिवसांपासुन सातत्याने इस्टेट एजंट, रुम मालक व भाडेकरु यांच्या विरुद्ध मोठ्या प्रमाणात फसवणुकीच्या तक्रारी पोलिस स्टेशनला येत आहे. सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलिस आयुक्त, मिरा रोड विभाग, राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलिस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलिस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी / अंमलदार यांनी केली आहे.



# खबरदार... विसर्जनानंतर गणेश मूर्तींचे फोटो काढाल तर पस्तावाल, पोलिसांचे आदेश काय ?

**मुंबई** : बुद्धीची देवता, सर्वांच्या लाडक्या गणरायाचे आगमन अवघ्या काही दिवसांवर आले असून गणेशाच्या स्वागतासाठी सर्व भक्तगण सज्ज झाले आहेत. पूजा, प्रसादाची तयारी, डेकोरेशन, या सर्व कामांची लगबग आता सुरू झाली असून गणपती बाप्पा मोरया चा गजर करच घराघरांत तसेच सार्वजनिक मंडळातही गणराय लवकरच विराजमान होतील. मात्र याच दरम्यान पोलिसांनी काही महत्वाचे आदेश दिले आहेत. गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

विसर्जनानंतर गणेशाच्या मूर्तीचे फोटो काढून का, असे आदेश पोलिसांनी दिले आहेत. विसर्जन झाल्यावर गणरायाच्या मूतीर्चे फोटो काढले, तसेच प्रसारित केले तर संबंधित व्यक्तीवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी हे महत्वाचे आदेश दिले आहेत.

**विसर्जनानंतर गणेश मूर्तींचे फोटो काढू नका अन्यथा... काय म्हटले आहे आदेशात ?**



- ७ सप्टेंबर रोजी गणपतीचे आगमन होणार असून त्यानंतर दीड दिवसापासून पुढे अनंत चतुर्दशीपर्यंत विविध दिवशी गणरायाचे विसर्जन करण्यात येते. त्यासंदर्भातच पोलिसांकडून आदेश जारी करण्यात आले आहेत.
- ०८, ११, १२, १३ आणि १७ सप्टेंबर रोजी गणपती विसर्जन होणार आहे. विसर्जनानंतर काही अर्ध्या विरघळलेल्या मूर्ती भरतीच्या वेळी किनाऱ्यावर वाहून येतात किंवा तलावाच्या पाण्यावर तरंगतात. काही लोक अशा तरंगणाऱ्या मूर्तीचे फोटो काढतात, तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी मूर्ती गोळा करतानाचे फोटो टिपतात आणि धार्मिक भावना दुखावतील तसेच सार्वजनिक शांतता व भावना भंग पावतील असे फोटो प्रसारित अथवा प्रकाशित करतात.
- विसर्जनानंतर असे फोटो काढणे, प्रकाशित करणे, हे प्रतिबंधित करण्यासाठी तत्काळ उपाययोजना आवश्यक आहेत. आणि कलम 163 भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये त्वरीत प्रतिबंधासाठी जलद उपाय करणे इष्ट आहे.
- याप्रकरणी पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांनी आदेश दिले आहेत. कोणत्याही व्यक्तीने विसर्जनानंतर गणेश मूर्तींचे फोटो काढू नयेत अथवा ते प्रसारित करू नयेत, असे त्यात नमूद करण्यात आले आहेत. ८ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर पर्यंत हा आदेश लागू राहील.
- तसेच या आदेशाचे उल्लंघ केल्यास संबंधित व्यक्तीवर कडक कारवाई करण्यात येईल, दंडही ठोठावला जाऊ शकतो.

# रुग्णालयाच्या निष्काळजीपणामुळे नवजात बालकाचा मृत्यू रुग्णालयाबाहेरच गर्भवतीची प्रसूती

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या निष्काळजीपणामुळे एका गर्भावतीची कळवा रुग्णालयाच्या बाहेरच प्रसूती झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी ९ दरम्यान घडली आहे. या घटनेत एका नवजात बालकाचा मृत्यू झाला आहे.




पोटात दुखू लागल्याने ही गर्भवती महिला पालिकेच्या कळवा रुग्णालयात पहाटे ४ च्या दरम्यान आली. मात्र तिला रुग्णालयात दाखल करून न घेता पुन्हा घरी पाठवण्यात आले. घरी गेल्यावर पुन्हा पोटात दुखू लागल्याने ती महिला पुन्हा रुग्णालयात आली, मात्र रुग्णालयात पोहोचण्यात उशीर झाल्याने गर्भवती महिलेची रुग्णालयाच्या बाहेरच प्रसूती झाली. एका बालकाला रुग्णालयाच्या बाहेरच जन्म दिल्यानंतर दुसऱ्या बालकाची प्रसूती मात्र रुग्णालयात करण्यात आली असून दुसरे बालक व्यवस्थित असल्याची माहिती रुग्णालयाच्या वतीने देण्यात आली आहे. आपल्या वादग्रस्त कारभारामुळे नेहमीच चर्चेत असणाऱ्या ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या निष्काळजीपणामुळे एका नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. कळवा पूर्व येथील अतिकोनेश्वर परिसरात राहणाऱ्या महिलेने आपले नाव छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातच नोंदवले होते. याच रुग्णालयात तिच्या नियमित तपासण्या सुरू होत्या. मंगळवारी पहाटे पोटात दुखू लागल्याने ती पहाटे ४ च्या दरम्यान कळवा रुग्णालयात आली. मात्र तिला रुग्णालयात दाखल करून न घेता पुन्हा घरी पाठवण्यात आले.

प्रसूतीची वेळ अद्याप आली नसल्याचे कारण देत तिला घरी पाठवण्यात आले. मात्र घरी गेल्यानंतर काही वेळात तिच्या पुन्हा पोटात दुखू लागल्याने ओला करून या महिलेला तिच्या नातेवाईकांनी पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणले. रुग्णालयात आणेपर्यंत उशीर झाल्याने या महिलेची रुग्णालयाच्या बाहेरच प्रसूती झाली. यामध्ये गाडीतच एक मूल बाहेर आले. त्यानंतर तातडीने या महिलेला लेबर वॉर्डला नेण्यात आले. त्यामुळे दुसऱ्या मुलाला या महिलेने रुग्णालयात जन्म दिला. मात्र दुदैर्वाने गाडीत प्रसूती झालेल्या बालकाला डॉक्टरांनी मृत घोषित केले तर दुसरे बालक व्यवस्थित असल्याची माहिती रुग्णालय व्यवस्थापनाच्या वतीने देण्यात आली आहे.

**तीन महिन्यांत ४९ नवजात बालके दगावली**

ठाणे महापालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय नवजात बालकांसाठी मृत्यूचे व्दार ठरत असून गेल्या तीन महिन्यांत या रुग्णालयात ४९ नवजात बालके दगावली असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दगावलेली सर्व नवजात बालके ही एनआयसीयूमधील असून विशेष म्हणजे यामध्ये अडीच किलोंच्या वर वजनाच्याही काही नवजात बालकांचा देखील समावेश आहे. धक्कादायक बाब म्हणजे नवजात बालकांचा डेथरेट हा सरासरी ७ टक्के असायला हवा तोच डेथरेट २३ टक्क्यांच्या वर असून गेल्या चार वर्षांत हा डेथरेट २० टक्क्यांच्या खाली आलेला नाही.

**...तर घटना टाळता आली असती**

ज्यावेळी ही महिला पहाटे पोटात दुखत असल्याने रुग्णालयात आल्यानंतर या महिलेला तेव्हाच दाखल करून का घेण्यात आले नाही? असा प्रश्न आता नातेवाईकांकडून उपस्थित केला जात आहे. कळवा रुग्णालय ते अतिकोनेश्वर नगर यामधील अंतर जास्त असल्याने तसेच हा भाग डोंगरपट्ट्यातील असल्याने रुग्णालयात वेळेत पोहचणे शक्य नाही. याशिवाय सकाळी ८ च्या नंतर कळवा अंतर्गत परिसरात होणाऱ्या वाहतूककोंडीमुळे रुग्णालयात वेळेत पोचवणे शक्य नसल्याने तेव्हाच या महिलेला दाखल केले असते तर हा अनर्थ टळला असता अशी भावना नातेवाईकांकडून व्यक्त केली जाते.

### राज्य सरकारकडून खासगी रुग्णालयांना मोठा दिलासा!

# डॉक्टरांच्या मागणीला अखेर यश




**पुणे** : राज्यातील खासगी रुग्णालयांना जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणीच्या शुल्कात सरकारने बदल केला आहे. रुग्णालयांना भांडवली गुंतवणुकीऐवजी रुग्णशय्येच्या संख्येनुसार हे शुल्क द्यावे लागणार आहे. यामुळे राज्यातील हजारो रुग्णालयांना दिलासा मिळाला आहे. खासगी रुग्णालयांना जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन आणि हाताळणीसाठी शुल्क आकारले जाते. हे शुल्क तीन वर्षांच्या कालावधीसाठी असते आणि ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करावे लागते. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने २०१६ पासून खासगी रुग्णालयांना हे शुल्क लागू केले. त्यामुळे हे शुल्क दर तीन वर्षांनी भरणे रुग्णालयांसाठी बंधनकारक आहे. सरकारने रुग्णालयांना त्यांच्या भांडवली गुंतवणुकीच्या तुलनेत हे शुल्क आकारण्यास सुरुवात केली. याला रुग्णालयांनी विरोध केला होता. इंडियन मेडिकल असोसिएशनची पुणे शाखा आणि हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाच्या पुणे शाखेने याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे यांच्याकडे मागणी केली होती. त्यात रुग्णालयांना जैव वैद्यकीय कचरा शुल्क भांडवली गुंतवणुकीच्या तुलनेत आकारण्याऐवजी रुग्णशय्येच्या आधारावर आकारावा, अशी मागणी करण्यात आली होती. अखेर सरकारने रुग्णशय्येचा आधारावर शुल्क आकारणी करण्याचा आदेश काढला आहे.

# मुंबई गोवा महामार्गावर रायगडच्या हद्दीत थेट सीसीटीव्हीची नजर

**पेण** : गणपती उत्सवासाठी कोकणवासीय गावाकडे परतू लागले आहेत. त्यांच्या प्रवासात कुठला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून रायगड पोलीस मुंबई-गोवा महामार्गावर दक्ष झाले आहे. रायगड जिल्ह्यात खारपाडा ते कशेडी घाट दरम्यान ७ ठिकाणी वाहतुकीचे नियोजन केले आहे. एवढेच नाहीतर महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून महामार्गावरील अनुचित प्रकारांवर तिसऱ्या डोळ्याची नजर ठेवली आहे. मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील मार्ग १४५ किलोमीटरचा आहे. या मार्गात गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांची कुठलीही गैरसोय होऊ नये म्हणून



१० ठिकाणी ४ सप्टेंबरपासून सुविधा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यासोबत ७ उपविभागीय पोलीस अधिकारी, ११ पोलीस निरीक्षक, ४२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ८२ वाहतूक पोलीस हवालदार, २११ पोलीस हवालदार प्रवाशांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आता २४ तास तत्पर आहेत. पोलिसांसोबतच १० सुविधा केंद्र महामार्गावर आहेत, त्यांची माहिती प्रवाशांना, वाहनाचालकांना द्या, असे आवाहन रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले आहे. गडबमधील काळंबादेवीच्या मंदिर सभागृहात घेतलेल्या आढावा बैठकीत पोलीस अधीक्षक घार्गे यांनी सर्वांना कामाची जबाबदारी सांगितली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन चौधरी, शिवाजी फडतरे, दौडकर, जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक एस. व्ही. लांडे, वडखळचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, पेणचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, दादर सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक नागेश कदम आदी अधिकारी उपस्थित होते.

# पद भरतीची जाहिरात रद्द, उमेदवारांना मात्र हजार रुपयांचा भुर्दंड

**मुंबई** : मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने (एसएनडीटी) प्रसिद्ध केलेली पदभरतीची जाहिरात आरक्षणाबाबतच्या तरतुदींमधील संदिग्धतेमुळे रद्द करण्यात आली तरी अर्जदार विद्यार्थ्यांना मात्र हजार रुपयांचा भुर्दंड सोसावा लागतो आहे. जुन्या जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या उमेदवारांचे शुल्क परत करावे अशी मागणी करण्यात येत आहे. एसएनडीटी विद्यापीठाने १४ डिसेंबर २०२३ रोजी पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्या जाहिरातीनुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी अर्ज शुल्क हे १ हजार रुपये आणि राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी ५०० रुपये होते. विविध पदांसाठी जवळपास २ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.




मात्र आरक्षणातील संदिग्धतेमुळे एसएनडीटी विद्यापीठाने ती जाहिरात रद्द केली. त्यानंतर नव्याने जाहिरात प्रसिद्ध करून पदभरती प्रक्रियाही सुरू केली आहे. मात्र त्यावेळी जुन्या जाहिरातीनुसार उमेदवारांनी भरलेले अर्ज ग्राह्य धरण्यात आलेले नाहीत. नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीत नवीन शुल्क भरण्याची तरतूदही केली आहे. त्यामुळे पूर्वीच्या जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांचे शुल्क वाया गेले आहे. जुन्या जाहिरातीनुसार भरलेले प्रवेश अर्ज शुल्क परत करावे, अशी मागणी उमेदवारांकडून करण्यात येत आहे. 'पदभरतीची संपूर्ण जाहिरात नव्याने प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामुळे पूर्वीची प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. हा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदस्यांसमोर घेण्यात आला होता. पदभरतीच्या पूर्वीच्या जाहिरातीनुसार अर्ज भरलेल्या उमेदवारांचे शुल्क परत करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल', असे मुंबईतील 'एसएनडीटी' महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी सांगितले. 'एसएनडीटी विद्यापीठाने नवीन जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागवले आहेत. त्यामुळे आधीच्या जाहिरातीनुसार केलेले अर्ज रद्द झाले आहेत.

# आईसोबत कारखान्यात गेलेल्या चिमुकल्याचा बिस्कीट बनवणाऱ्या मशीनमध्ये अडकून मृत्यू

**अंबरनाथ** : एका आईच्या डोळ्यादेखत तिच्या तीन वर्षीय मुलाचा जीव जाण्याची दुर्दैवी घटना अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसीमध्ये घडली. आईसोबत बिस्कीट कंपनीत गेलेल्या आयुष चौहान या चिमुकल्याचा बिस्कीट बनवणा[illegible]या मशीनमध्ये अडकून दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण अंबरनाथमध्ये शोककळा पसरली आहे.

अंबरनाथच्या ठाकुरपाडा परिसरात पुजा चौहान ही महिला आपल्या तीन वर्षीय मुलासोबत राहते. आर्थिक तंगीमुळे पूजाला राधे कृष्ण बेकर्स या कंपनीत कामगारांना डबे पुरवण्याचे काम करावे लागत होते. मंगळवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ती नेहमीप्रमाणे डब्बे देण्यासाठी कारखान्यात गेली. तिने आयुषला देखील सोबत नेले, कारण घरी त्याला सांभाळणारे कोणीही नव्हते. मात्र, पूजाला कल्पनाही नव्हती की या निर्णयामुळे तिच्या आयुष्यातील सर्वात मोठा दुःखद प्रसंग ओढवणार आहे.

कारखान्यातील वातावरण आणि बिस्कीटांचा मोह आयुषला अनावर





झाला. आई डबे देत असताना, आयुष उत्साहाने खेळत बिस्कीट बनवणाऱ्या मशीनकडे धावला. याचवेळी, दुर्दैवाने मशीनच्या पट्टामध्ये अचानक आयुषचा गळा अडकला. एका क्षणाच्या निष्काळजीपणामुळे आयुषचा गळा पट्ट्यात ओढला गेला आणि तो गंभीर जखमी झाला. कामगारांनी तात्काळ आयुषला उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात नेले, पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे पूजावर आणि तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अशोक भगत यांनी सांगितले की, या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेने केवळ पूजाच नाही, तर संपूर्ण अंबरनाथमधील लोकांना हादरवून सोडले आहे.

या दुर्घटनेने अनेक सामाजिक आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. लहान मुलांच्या सुरक्षेसाठी कारखान्यांमध्ये आवश्यक ती खबरदारी घेतली जात नाही, हे या घटनेने स्पष्ट केले आहे. मुलांना अशा ठिकाणी नेण्याचे धोके किती मोठे असू शकतात, हे लक्षात घेता, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी कडक नियमावलीची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. मुलांच्या सुरक्षेची जबाबदारी घेण्याच्या बाबतीत पालक आणि कामगारांनी अधिक सजग राहणे गरजेचे आहे, अन्यथा अशा हृदयद्रावक घटना टाळता येणार नाहीत.

# हर्बलच्या नावाखाली भांगेच्या गोळ्यांची तस्करी



**ठाणे** : हर्बल आयुर्वेदिक गोळ्यांच्या नावाखाली भांग मिश्रीत अमली पदार्थाच्या गोळ्यांची रेल्वेतून तस्करी करणाऱ्या अकवर हसन इक्बाल हसन खान या प्रमुख सूत्रधारासह ऐकून १६ जणांच्या टोळीला राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या चार पथकांनी अटक केल्याची माहिती कोकण विभागीय उपायुक्त प्रदीप पवार यांनी बुधवारी दिली. या टोळीकडून आठ वाहनांसह उत्तरप्रदेशात बनविण्यात आलेला भाग मिश्रीत पदार्थाचा यामध्ये पाच लाख ३९ हजारांचा ४३५ किलोग्रॅम गांजा तसेच आठ वाहनांसह ४२ लाख ३३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. महाकाल मुनकावटी या नावाने हर्बल आयुर्वेदिक गोळ्यांच्या नावाखाली उत्तरप्रदेशात बनविण्यात आलेल्या भांग मिश्रीत अमली पदार्थाच्या गोळ्यांची मुंबईतील बांद्रा रेल्वे जंक्शन येथून मुंबईतील खेरवाडी तसेच ठाणे, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली भागात मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. त्याच आधारे उपायुक्त प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली २ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबईतील बांद्रा रेल्वे जंक्शन भागात कोकण विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्यासह चार पथकांनी सापळा लावला. याच धाडसत्रात तीन टेम्पोमधून भांगेच्या या गोळ्यांचा साठा हस्तगत केला. यामध्ये शेख याच्यासह सहा जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याच चौकशीमध्ये यातील सूत्रधार अकबर खान याला अटक करुन त्याच्याकडूनही यातील काही साठा हस्तगत केला. त्यानंतर अन्य एका पथकाने भिवंडीत छापा टाकून भरत चौधरी अटक केली. तिसऱ्या पथकाने ठाण्यातील मानपाडा भागातून गणाराम चौधरी आणि विजेशकुमार गुप्ता यांच्याकडूनही काही साठा हस्तगत केला. पुढील चौकशीमध्ये चौथ्या पथकाने मुंबईच्या बोरीवली भागातून सचिन गौड, शुभम चौरसिया यांनाही अटक केली. त्याच्या चौकशीमध्ये आणखी तिघांना मुंबईतूनच अटक केली. त्यानंतर ३ सप्टेंबर रोजी मुंब्रा भागात छापा टाकून सुदर्शन यादव याची धरपकड करण्यात आली.

# इमारतीच्या 20 व्या मजल्यावरील छताचा भाग कोसळून तिघे ठार, तिघे जखमी

**मुंबई** : मालाड येथील हाजी बापू मार्गावरील गोविंद नगर येथील बांधकाम सुरू असलेल्या नवजीवन या इमारतीच्या २० व्या मजल्याच्या छताचा काही भाग गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास अचानक कोसळला. या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून तिघे जखमी झाले आहेत. मालाड येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (झोपु) बहुमजली इमारतीचे बांधकाम सुरू होते. गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास अचानक २० व्या मजल्याच्या छताचा भाग कोसळला. बांधकामस्थळी काम करणारे काही कामगार मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य हाती घेतले.

या दुर्घटनेत जखमी झालेल्या सहा जणांना मातीच्या ढिगाऱ्याखालून बाहेर काढून नजिकच्या एम. डब्ल्यू देसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी तिघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. सध्या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दोघांवर उपचार सुरू आहेत. तर, एकाला ऑर्थोपेडिक विभागात दाखल करण्यात आले आहे. अद्याप जखमी व मृत कामगारांची नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

# लेखापाल अंबर दलालप्रकरणाशी संबंधित मुंबई, कोलकाता येथे ईडीचे छापे

**मुंबई** : सनदी लेखापाल अंबर दलाल याने २००९ गुंतणूकदारांची ११०० कोटी रुपयांची फसवणूक केली होती. त्याप्रकरणात सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) मुंबई व कोलकाता येथे छापे टाकले. या कारवाईत दोन कोटी रुपयांची रोख रक्कम, बँक खात्यातील पैसे, डिमॅट खाते अशी एकूण दोन कोटी रुपयांची मालमत्ता गोठवण्यात आली आहे. तसेच दुबईमधील स्थावर मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे आणि डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आल्याची माहिती ईडीकडून गुरुवारी देण्यात आली.

या प्रकरणात आतापर्यंत दोन वेळा छापे टाकले असून एकूण ३९ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. मुंबई पोलिसांनी दलाल विरोधात दाखल केलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यांच्या आधारावर जून महिन्यात ईडीने याप्रकरणी तपासाला सुरुवात केली होती. मुंबईच्या ओशिवरा पोलिसांनी १५




मार्च रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीचे मालक दलाल यांच्याविरुद्ध सुरुवातीला डझनभर गुंतवणूकदारांची ५४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. जुहू येथील फॅशन डिझायनर बबिता मलकानी यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी तक्रारदारांची संख्या वाढली असून आतापर्यंत २००९ तक्रारदार आर्थिक गुन्हे शाखेकडे आले आहेत.

आरोपींनी त्यांची एकूण ११०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर दलाल १२ दिवस पोलिसांचा समेमिरा चुकवत होता. अखेर आर्थिक गुन्हे शाखेने दलालला देहरादून येथून अटक केली होती. सध्या तो न्यायालयीन कोठाडीत आहे. आरोपीने चांदी, सोने, क्रूड ऑईल या सारख्या कमोडिटीमध्ये ट्रेडिंग करून प्रत्येक महिन्याला १.५ ते १.८ टक्के परतावा देण्याचे आश्वासन दिले होते. आरोपीने दुबई व अमेरिकेतही कंपन्या स्थापन करून तेथील गुंतवणूकदारांकडूनही मोठी रक्कम घेतल्याचा संशय आहे. अंबर दलालने दुबईत एक सदनिका खरेदी केली होती. तसेच पुढे सदनिकेच्या विक्रीचा प्रयत्न केला होता. सध्या हा व्यवहार थांबवण्यासाठी मुंबई पोलीस प्रयत्न करीत आहेत. अमेरिका व दुबईतील गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याने याप्रकरणात परदेशी यंत्रणाही सहभागी होण्याची शक्यता आहे.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार, १० सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२४


# संपादकीय

## 'ती'च्या रक्षणाची सुबुद्धी मिळो!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

'गणपती बाप्पा मोरया'चा गगनभेदी जयघोष, वरुणराजा अधूनमधून देत असलेली सलामी, ढोल-ताशांचा दणदणाट, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत आज गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर घरोघरी, शहराच्या विविध भागातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात बाप्पा विराजमान होतील. आनंद, चैतन्य आणि उत्साहाचा वर्षाव करणाया गणरायाचे आगमन हा आबालवृद्धांपासून सर्वांसाठीच भावपूर्ण सोहळा असतो. गणेशोत्सवामुळे सर्वत्र मंगलदायी वातावरण तयार झाले आहे.

घराघरात, मंडपा-मंडपातील उत्साही कार्यकर्त्यांमध्ये भक्तीचा नवा जोश संचारलाय. गणरायांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशभक्त आपापल्या परीने बाप्पाची मनोभावे सेवा करतील. कुठे दीड दिवसापासून ते अकरा दिवसापर्यंत तर काही मंडळात 21 दिवसांसाठी बाप्पा विराजमान असतील. त्यामुळे पुढील काही दिवस आसमंतात सुमधूर आरत्या, स्तोत्र आणि मंत्रपठणाचा स्वर उमटेल. बाप्पाच्या नैवेद्यासाठी तयार होणाया नेर्वया, मोदक-लाडू, चिवडा-चकल्यांचा खमंगपणा या भक्तिमय वातावरणाची लज्जत आणखीनच वाढवतील. खरे तर मोठ्या शहरांमध्ये खासकरून मुंबई-ठाणे, नाशिक, पुण्यातील गणेश मंडळांमध्ये मागील आठवडाभरापासूनच बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू झाली होती. मूतीर्शाळांसाठी प्रसिद्ध असलेल्या लालबाग-परळमधून गणराय एक एक करत मंडपांकडे दिमाखात मार्गस्थ होत होते. ट्रक-टेम्पो, रिक्षा-टॅक्सी ते अगदी ट्रेनमधूनही बाप्पा वेगवेगळ्या शहरांच्या दिशेने निघाले होते. आपल्या लाडक्या बाप्पाची पहिली छबी डोळ्यात साठवून घेण्यासाठी लालबाग-परळचे मुख्य रस्ते भाविकांच्या गदीर्ने फुलून जात होते. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक पयार्यी मागार्ने वळवण्याची वेळ वाहतूक पोलिसांवर आली होती. कुठे बाप्पाची पहिली छबी टिपण्याची तर कुठे बाप्पासोबत सेल्फी काढण्यासाठी झुंबड उडाली होती. बाप्पासोबत काढलेले फोटो सोशल मीडियावर धडकू लागले आहेत. गणरायाच्या स्वागताला उपस्थित राहण्याची निमंत्रणेही येऊ लागली आहेत. आता तर पुढचे अकरा दिवस भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम महानगरांमध्ये दिसून येईल. पण हा उत्सव साजरा करताना भाविकांच्या त्यातही महिलांच्या सुरक्षेची मोठी जबाबदारी पोलीस यंत्रणेवर असेल. कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर बदलापूरच्या एका नामांकित शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचारानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असली, तरी राज्यातील महिलांवरील अत्याचाराचे सत्र थांबलेले नाही. दर दिवशी कुठे ना कुठे महिला व लहान बालकांवरील अत्याचाराच्या घटना समोर येतच आहेत.

महाराष्ट्रात गेल्या 5 वर्षांत दोन सरकार सत्तेत आली. या दोन्ही सरकारच्या कार्यकाळात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये कोणतीही घट झालेली नाही. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, 2020 मध्ये राज्यात महिलांविरोधात दररोज 88 गुन्हेगारी घटना नोंदवण्यात आल्या, तर 2023 मध्ये दररोज 126 महिला विविध अत्याचाराच्या बळी ठरत होत्या. चालू वर्षात देखील ही परिस्थिती बदललेली नाही.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना मासिक 1500 रुपयांची योजना जाहीर करून आपण जिंकलोच या थाटात सध्याचे सत्ताधारी वावरत आहेत. पण याच राज्यातील लाडक्या बहिणींच्या मनामध्ये मात्र असुरक्षिततेची भावना दाटली आहे. एकीकडे बदलापुरातील स्थानिक रेल्वे स्थानकात उतरून आपला संताप व्यक्त करत असताना दुसरीकडे बदलापूरच्या वेशीवर एक मुलगा संपत्तीच्या वादातून आपल्या कुटुंबियावर गाडी घालण्याचा अघोरी प्रकार करत होता. त्याच बदलापूर रेल्वे स्थानकात गुरूवारी चौघा मित्रांच्या वादातून एकाने ऐन दुर्सया मित्रावर गोळीबार करत त्याला जखमी केले. ऐन गर्दीच्या वेळेस ही घटना घडल्याने रेल्वे स्थानकात प्रवाशांमध्ये घबराट उडाली होती. कल्याणमधील एका आमदाराने प्रतिस्पर्धी पक्षातील नेत्याला गोळी घालून ठार करण्याचा केलेला प्रयत्न महाराष्ट्रातील राजकीय संघर्ष किती टोकाला पोहोचलाय याचा वस्तुपाठ घालून देणाराच ठरावा. मुंबई-पुण्यातील हिट अँड रनमधील मद्यपी आरोपीला वाचवण्याचा प्रकार असो किंवा बदलापूरच्या शाळेतील संस्थाचालकांना पाठीशी घालण्याचा प्रकार ही सर्व उदाहरणे महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्थेचा किती बोजवारा उडालाय हेच दाखवणारी आहेत. विधानसभा निवडणूक तोंडावर आल्याने राज्यातील सर्वच पक्षांतील नेत्यांचे फोटो आधी दहीहंडी आणि आता गणेशोत्सव मंडळांच्या बॅनरवर झळकू लागलेत. सण-उत्सवाच्या काळात मंडळांवर निधीचा वर्षाव करून कार्यकर्त्यांना खूश ठेवण्यासाठी नेतेमंडळींची प्रचार यंत्रणा झोकून कामाला लागलीय. याच निधीचा वापर करून बहुतांश गणेशोत्सव मंडळाच्या देखाव्यांमध्ये महिला अत्याचाराच्या विषयांना प्राधान्य दिले जात आहे.

लाडक्या बहिणींसाठी केवळ योजनांची घोषणा न करता त्यांच्या रक्षणासाठी कृतीची गरज असल्याचे त्यातून अधोरेखित केले जात आहे. निवडणुकीसाठी एकमेकांवर चिखलफेक करण्यात, शिवरायांच्या पुतळ्याचे राजकारण करण्यात व्यस्त असलेल्या नेतेमंडळींच्या डोक्यात समाजासाठी काम करण्याची, महिलांच्या रक्षणाची सुबुद्धी मिळो, हीच बाप्पा चरणी प्रार्थना.

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय की मत?
# अनुसूचित जाती व जमातींचे उपवर्गीकरण

मोठ्या प्रमाणात आरक्षणाचा लाभ घेत असलेल्या आणि त्यांच्यापैकी वंचितांना विशेष वागणूक नाकारणाऱ्या वगार्तील लोक जे करत आहेत, तेच उच्च जातीतील लोकांनी शतकानुशतके या लोकांशी केले आहे, हे न्यायालयाचे उपवर्गीकरणाबाबतचे मत महत्त्वाचे आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाने अनुसूचित जातींमध्ये इतर मागासवगीर्यांप्रमाणेच उपवर्गीकरणास परवानगी आहे का? या प्रश्नावर विचार केला आणि त्याला होकारार्थी उत्तर दिले. सर्वोच्च न्यायालयासमोरचे इतर प्रश्न असे होते की, ह्यअनुसूचित जाती हा एकसंध वर्ग नसेल, तर ज्या वगार्ला पुरेसे प्रतिनिधित्व नाही अशा वगार्तील सर्वात खालच्या स्तरावरील लोकांना प्राधान्य दिले जाऊ शकते का? , आणि अनुसूचित जातींमधील काही जातींना पुरेसे प्रतिनिधित्व नसल्यास वाजवी कोटा निश्चित करून तर्कशुद्ध आधारावर आरक्षणाचा लाभ देणे हे कलम १६ (४) अंतर्गत राज्यासाठी खुले असेल का? सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचे आदेश दिले आहेत, हा सर्वसाधारण समज आहे. माझ्या मते असा अर्थ काढणे योग्य नाही. त्यासाठी आपल्याला या निर्णयाच्या मागील कारणांची मीमांसा करावी लागेल. पंजाब विधानसभेने २००६ मध्ये वाल्मीकी आणि मझहबी शिखांना प्राधान्य देऊन अनुसूचित जातींमध्ये वर्गीकरण करण्याबाबत कायदा केला. या तरतुदीला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले आणि नंतर न्यायालयाने याला रद्द ठरवले. राज्याने याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्याचप्रमाणे, हरियाणा सरकारनेही अनुसूचित जातींचे दोन गटांमध्ये वर्गीकरण करण्याची अधिसूचना जारी केली, त्यालाही उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. २००९ मध्ये तमिळनाडूनेदेखील अनुसूचित जातींच्या यादीमधून एका जातीला विशेष आरक्षण देणारा असाच कायदा केला होता, या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने ई. व्ही. चिन्नय्या-विरुद्ध-आंध्र प्रदेश राज्य प्रकरणात असे वर्गीकरण असंवैधानिक असल्याचे घोषित केले होते.

या प्रकरणावरील खटला २७ ऑगस्ट २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयात पोहोचला, तेव्हा पंजाब राज्य-विरुद्ध-देविंदर सिंग या प्रकरणातील आणखी एका घटनापीठाने असे म्हटले की, चिन्नय्या निकालावर सात न्यायाधीशांच्या मोठ्या खंडपीठाने पुनर्विचार करणे आवश्यक आहे. खंडपीठाकडून बोलताना न्यायमूर्ती अरुण मिश्रा यांनी मुख्य न्यायमूर्तींकडे हे प्रकरण मोठ्या खंडपीठासमोर ठेवण्याची विनंती केली होती. मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती बी. आर. गवई यांच्यासह सहा न्यायमूर्तींनी असे मत व्यक्त केले की, उपवर्गीकरणास परवानगी आहे. परंतु, न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी विरोधात मत मांडले. उपवर्गीकरणाच्या व्याप्तीचा सारांश स्पष्ट शब्दात देताना, अनुसूचित जाती हा एकसंध वर्ग नाही, असे मत व्यक्त करताना मुख्य न्यायमूर्तींनी सांगितले की, राज्याने हे सिद्ध केले पाहिजे की, जाती/गटाचे प्रतिनिधित्व अपुरे असणे हे त्याच्या मागासलेपणामुळे आहे आणि त्यासाठी राज्याने राज्यांच्या सेवांमध्ये प्रतिनिधित्व अपुरे असल्याची आकडेवारी गोळा केली पाहिजे. कारण ती मागासलेपणाचे सूचक म्हणून वापरली जाते.

न्यायमूर्ती गवई यांनी आरक्षण देण्याच्या राज्याच्या कर्तव्याबाबत चर्चा केली. आंध्र प्रदेशातील अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणासंदर्भात न्यायमूर्ती उषा मेहरा यांनी राष्ट्रीय आयोगाने १ मे २००८ रोजी दिलेल्या अहवालाची दखल घेतली आणि आंध्र प्रदेशच्या राष्ट्रपतींच्या यादीत ६० अनुसूचित जातींचा समावेश असला तरी त्यातील केवळ चार किंवा पाच जातींनी आरक्षणाचा लाभ घेतला आहे आणि बाकीचे मागे पडले आहेत. मोठ्या प्रमाणात आरक्षणाचा लाभ घेत असलेल्या आणि त्यांच्यापैकी वंचितांना विशेष वागणूक नाकारणाऱ्या वगार्तील लोक जे करत आहेत, तेच उच्च जातीतील लोकांनी शतकानुशतके या लोकांशी केले आहे. ज्याचा परिणाम म्हणून मागासवगीर्यांना युगानुयुगे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आले होते, त्यात त्यांचा कोणताही दोष नव्हता. गवई पुढे म्हणाले. राष्ट्रपतींच्या यादीतील ज्या वर्गांना आधीच मोठ्या प्रमाणात आरक्षण मिळाले आहे, त्यांनी अशा लाभापासून वंचित असलेल्यांना राज्याने विशेष वागणूक देण्याबाबत आक्षेप घेऊ नये असा सल्ला दिला.

क्रीमीलेयर वापराच्या प्रश्नावर सुनावणी करताना, न्यायमूर्ती गवई यांनी दोन प्रश्न विचारले, १) अनुसूचित जातींच्या श्रेणीतील असमानांना समान वागणूक दिल्याने समानतेचे घटनात्मक उद्दिष्ट पुढे जाईल की ते अपयशी ठरेल? आणि २) आयएएस, आयपीएस किंवा नागरी सेवा अधिकाऱ्यांच्या मुलाची तुलना गावातील ग्रामपंचायती/जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या वंचित सदस्याच्या मुलाशी केली जाऊ शकते का? उपवर्गीकरणास परवानगी आहे, असा निष्कर्ष काढत असताना न्यायमूर्ती गवई यांनी असा युक्तिवाद केला की, असे करताना राज्याला हे सिद्ध करावे लागेल की फायदेशीर वागणूक मिळवणाऱ्या गटाचे प्रतिनिधित्व इतरांच्या तुलनेत अपुरे आहे, उपवगार्चे पुरेसे प्रतिनिधित्व नाही, यादीमधील इतर जातींना वगळण्यासाठी राज्याला उपवर्गाच्या बाजूने १०० टक्के जागा राखीव ठेवण्याचा हक्क नसेल. उपवगार्चे तसेच मोठ्या वगार्साठी आरक्षण असेल तरच अशा उपवर्गीकरणास परवानगी असेल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी क्रीमीलेयरचे निकष ओबीसींना लागू असलेल्या निकषांपेक्षा वेगळे असू शकतात.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि एस.सी. शर्मा यांनी न्यायमूर्ती गवई यांच्या मताशी सहमती दर्शवली. न्यायमूर्ती पंकज मित्तल यांनी सरन्यायाधीश आणि न्यायमूर्ती गवई यांच्याशी सहमती दर्शवली असली तरी स्वतंत्र निर्णय लिहिला. सरन्यायाधीशांनी लिहिलेल्या निर्णयावर न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांनी स्वाक्षरी केली.

यापूर्वी १९९२ साली मंडल आयोग प्रकरणातील (इंदिरा साहनी प्रकरण) नऊ न्यायमूर्तींच्या मोठ्या खंडपीठाने ओबीसींना ही तत्त्वे लागू करताना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना उपवर्गीकरण आणि क्रीमीलेयरच्या बाहेर ठेवले होते. १९९२ ते २०२४ पर्यंत देशाने खूप मोठा प्रवास केला आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने आता अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये उपवर्गीकरणास परवानगी दिली आहे. आता चेंडू राजकीय अधिकाऱ्यांच्या अंगणात आहे. प्रत्येक राज्याला उपवर्गीकरण करायचे की नाही याचा पर्याय असेल, परंतु कोणत्याही राज्याने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा पर्याय निवडला तर त्याला पुढील कृती केल्यानंतर त्याच्या कृतीचे समर्थन करावे लागेलः

अ) जातीआधारित जनगणना

ब) प्राधान्यक्रम देण्यापूर्वी राष्ट्रपतींच्या यादीमधून विशिष्ट जाती/उपजातीला अपुऱ्या प्रतिनिधित्वाबद्दल माहिती गोळा करणे.

क) त्याने त्याच्या धोरणाचा उद्देशाशी असलेला संबंध सिद्ध केला पाहिजे.

ड) उपवगीर्कृत गट इतरांपेक्षा लक्षणीयरीत्या वेगळा आहे हे सिद्ध करावे लागेल.

ई) उपवगीर्कृत गट इतरांपेक्षा अधिक वंचित आहे हे सिद्ध करावे लागेल.

आज आपल्याकडे दोन प्रमुख राजकीय गट आहेत, एक जातीनिहाय जनगणनेला पाठिंबा देणारा आणि दुसरा त्याला विरोध करणारा. गेल्या चार वर्षांपासून, ओबीसींच्या संदर्भात समाधानकारक आकडेवारी नसल्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नाहीत. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे उपवर्गीकरण दूरगामी आहे असे दिसते.

उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्या प्रवर्गांची वृत्ती रेल्वेच्या सामान्य डब्यातील व्यक्तीसारखी आहे. सर्वप्रथम, डब्याच्या बाहेर असणाऱ्यांना सामान्य डब्यात प्रवेश करण्यासाठी धडपड करावी लागली. आणि एकदा ते आत गेले की, अशा डब्याच्या बाहेरील व्यक्तींना त्यात प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करतात. - न्या. बी. आर. गवई

# साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे




कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात. ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या 'युनेस्को' या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वषार्पासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरू केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरू केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला. भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.०६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १०० टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

## भारतीय रेडिओ खगोलशास्त्रज्ञ डॉ. गोविंद स्वरूप



डॉ. गोविंद स्वरूप यांना भारतीय रेडिओ खगोलशास्त्राचे जनक मानले जाते. त्यांचा जन्म 23 मार्च 1929 रोजी ठाकूरद्वार, उत्तर प्रदेश येथे झाला. त्यांनी अलाहाबाद येथून 1948 मध्ये बी.एससी.ची पदवी मिळवली. त्यानंतर 1950 मध्ये विज्ञानाची मास्टर्स (MSc) पदवी संपादन करून त्यांनी 1952 मध्ये ऑस्ट्रेलियामधील सी.एस.आय.आर.ओ. येथे खगोलशास्त्र विषयक कार्य सुरू केले. पुढे 1961 मध्ये त्यांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठातून पी.एचडी. संपादन केली. डॉ. गोविंद स्वरूप यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय भौतिकशास्त्र प्रयोगशाळेत काम केले तसेच CSIRO ऑस्ट्रेलिया येथे 1953-55 या काळात काम केले. त्यांनी 1956-57 मध्ये हार्वर्ड विद्यापीठात संशोधन सहाय्यक म्हणून तर 1957-60 या काळात स्टॅनफर्ड विद्यापीठात संशोधन सहाय्यक म्हणून तर 1961-63 या काळात स्टॅनफोर्ड विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले. सिडनीजवळील पॉट्स हिल येथे 6 फूट व्यासाच्या 32 अन्वस्त अंटेना उभारण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील पहिली आधुनिक रेडिओ दुर्बीण मुंबईजवळील कल्याणच्या परिसरात उभारण्यात आली. या दुर्बिणीच्या सहाय्याने सूयार्ची निरीक्षणे घेण्यात आली. त्यानंतर डॉ. गोविंद स्वरूप यांनी दक्षिण भारतात उटी येथेही रेडिओ दुर्बीण उभारली. उटी येथील दुर्बिणीच्या यशानंतर महाराष्ट्रातील खोडद – नारायणगाव येथे जगातील दुर्सया क्रमांकाची महाकाय रेडिओ दुर्बीण उभारण्याचे काम त्यांनी केले. 1972 साली 'पद्मश्री' आणि 1973 सालच्या 'शांतीस्वरूप भटनागर' पारितोषिकाचे ते मानकरी ठरले आहेत.त्यांना इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमीचे 'प्रशांतचंद्र महालनोबीस पदक' आणि 'सी.व्ही. रमण पदक', नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेसचे 'मेघनाद साहा पदक', इंडियन फिजिक्स असोसिएशनचे 'बिर्ला पारितोषिक' असे अनेक राष्ट्रीय पुरस्कार दिले गेले आहेत. महाराष्ट्रातल्या मानाच्या फाय फाउंडेशन पुरस्कारानेही ते सन्मानित झाले आहेत.अशा या महान खगोलशास्त्रज्ञाचे 7 सप्टेंबर 2020 रोजी निधन झाले.

## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१९२८२८

बांधकाम / विद्युत विभाग

जा.क्र.मनपा/साबां/६०/२०२४-२५ दिनांक ०५/०९/२०२४

//जाहिर नोटीस//

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी बसवण्यात आलेले राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यांचे व चबुतऱ्याचे स्ट्रक्चअर ऑडीट करणे कामी चालु जिल्हा दरसुचीमध्ये दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातुन दरपत्रक नसल्याने मिरा-महानगरपालिकेच्या पॅनेलवर कंन्सल्टंट / बांधकाम अभियंता मार्फत दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामाकरिता दि. 13/09/2024 रोजी संध्या 4.00 वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, बांधकाम विभाग, 4 था मजला येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरुन देण्यात यावेत.

जा. क्र. मनपा /मावज / /E-2764431/2024-25
दि. ०५/०९/२०२४

सही
(शहर अभियंता)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# पूर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंगांना अधिक महत्त्व



12 ज्योतिर्लिंग अनुक्रमणिका
12 ज्योतिर्लिंग

12 ज्योतिर्लिंग नाव व ठिकाण
सोमनाथ ज्योतिर्लिंग

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग
महाकालेश्वर ज्योतिर्लिंग
ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग

केदारनाथ ज्योतिर्लिंग
भीमाशंकर ज्योतिर्लिंग
काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग
त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग
वैद्यनाथ/वैजनाथ ज्योतिर्लिंग
औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग
रामेश्वर ज्योतिर्लिंग
घृणेश्वर ज्योतिर्लिंग

१२ ज्योतिर्लिंग नाव व ठिकाण

तसं पाहायला गेलं तर देशभरात शंकर महादेवाची अनेक मंदिरे आहेत. परंतु या मंदिरांपैकी १२ ज्योतिर्लिंगांना अधिक महत्त्व दिले जाते, कारण या १२ ज्योतिर्लिंगांची उत्पत्ती ही साक्षात शंकर महादेवांमुळे झाली आहे.

१२ ज्योतिर्लिंग नाव व ठिकाण

सोमनाथ ज्योतिर्लिंग

पहिल्या क्रमांकाचे सोमनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या गुजरात राज्याच्या वेरावळ या ठिकाणी समुद्रकिनारी स्थित आहे. या अतिप्राचीन मंदिराचे अस्तित्व २००० वर्षाहून अधिक असल्याचे मानले जाते तसेच हिंदू पुराणात या मंदिराचा उल्लेख आढळून येतो.

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग

दुसऱ्या क्रमांकाचे मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग हे भारताच्या आंध्रप्रदेश राज्यातील श्रीशैलम या ठिकाणी स्थित आहे. या मंदिरात शंकर महादेवासोबत देवी पार्वतीची देखील पूजा केली जाते.

महाकालेश्वर ज्योतिर्लिंग

तिसऱ्या क्रमांकाचे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या मध्यप्रदेश राज्यातील उज्जैन या ठिकाणी स्थित आहे. महाकालेश्वर ज्योतिर्लिंग बारा ज्योतिर्लिंगांपैकी सर्वात पवित्र ज्योतिर्लिंग मानले जाते.

ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग

चौथ्या क्रमांकाचे ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या मध्यप्रदेश राज्यातील खंडवा या ठिकाणी स्थित आहे. हे ज्योतिर्लिंग नर्मदा नदी काठावर वसले आहे.

केदारनाथ ज्योतिर्लिंग

पाचव्या क्रमांकाचे केदारनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या उत्तराखंड राज्यातील केदारनाथ या ठिकाणी स्थित आहे. केदारनाथ ज्योतिर्लिंग हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक तसेच छोटा चार धाम पैकी एक धाम म्हणून ओळखले जाते.

भीमाशंकर ज्योतिर्लिंग

सहाव्या क्रमांकाचे भीमाशंकर ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यामध्ये भीमाशंकर या ठिकाणी स्थित आहे.

काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग

सातव्या क्रमांकाचे काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या उत्तरप्रदेश राज्यातील वाराणसी या ठिकाणी स्थित आहे.

त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग

आठव्या क्रमांकाचे त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील नाशिक या ठिकाणी स्थित आहे.

वैद्यनाथ/वैजनाथ ज्योतिर्लिंग

नवव्या क्रमांकाचे वैद्यनाथ/वैजनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील परळी या ठिकाणी स्थित आहे. या ज्योतिर्लिंगाला परळी वैजनाथ म्हणून ओळखले जाते.

औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग

दहाव्या क्रमांकाचे औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील हिंगोली या ठिकाणी स्थित आहे.

रामेश्वर ज्योतिर्लिंग

अकराव्या क्रमांकाचे रामेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या तामिळनाडू राज्यातील रामनाथपुरम या ठिकाणी स्थित आहे.

घृणेश्वर ज्योतिर्लिंग

सर्वात शेवटचे आणि बाराव्या क्रमांकाचे घृणेश्वर ज्योतिर्लिंग हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद या ठिकाणी स्थित आहे.

---

**महिला आणि दागिने हे समीकरण काही वेगळे नाही. दागिन्यांची आवड कोणत्याही वयातील महिलेला तितकीच असते. शृंगाराने सजलेल्या महिलेचे सौंदर्य कायमच खुलून दिसते. काळानुसार दागिन्यांचे स्वरूप बदलले असले तरीही सोन्याच्या दागिन्यांची महिलांमध्ये असणारी आवड आजही तितकीच आहे. नव्याने आलेल्या दागिन्यांमधील डिझाईनबरोबरच मागील काही वर्षांत पारंपरिक दागिन्यांचीही मोठी चलती असल्याचे पाहायला मिळते.**



# अशी घ्या सोन्याच्या दागिन्यांची काळजी

**लग्न** समारंभात किंवा काही विशेष कार्यक्रमात आपण सोन्याचे दागिने वापरतो, पण नंतर मात्र घाईगडबडीत कपाटात तसेच ठेवून देतो. आता रोज दागिने घालून थोडेच फिरणार आहोत, तेव्हा काही सण समारंभ सोडले तर या दागिन्यांचा वापर आपल्याला होतच नाही. पण हे दागिने जरी वापरात नसले तरी त्याची काळजी घेणंही आवश्यक आहे. अनेक दिवस लॉकरमधून बाहेर न काढलेल्या दागिन्यांची चकाकी कमी होऊ शकते. आणि मग जेव्हा आपल्याला हे दागिने घालण्याची वेळ येते तेव्हाच आपल्याला हे आठवते. असे होऊ नये म्हणून काही सोप्या गोष्टी केल्यास हे दागिने कायम चमकदार दिसून आपण उठून दिसू शकतो. मात्र घरच्या घरी ही काळजी कशी घ्यावी याची माहिती आपल्याला नसते. यासाठी काही खास टिप्स तुमच्यासाठी आणल्या आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही आपल्या सोन्याच्या दागिन्यांची चांगल्या पद्धतीने काळजी घेऊ शकता.



■ सोन्याचे दागिने वापरताना ते सतत रसायनांच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्या. अनेकदा आपण अंगावर दागिने घालूनच आंघोळीला जातो किंवा धुणी भांडी करत असतो. या क्रियेत दागिने हे साबण किंवा शॅम्पूच्या संपर्कात येतात, यामुळे तुमच्या सोन्यावर असलेली झळाळी कमी होऊ शकते.

■ सोन्याचे दागिने इतर कोणत्याही दागिन्यांसोबत ठेवू नका. शक्यतो प्रत्येक दागिन्यांसाठी वेगळा बॉक्स ठेवा. मोत्याचे, चांदीचे आणि इतर खोट्या दागिन्यांच्या संपर्कात सोन्याचे दागिने आल्यास त्याची चकाकी कमी होऊ शकते.

■ सोन्याचे दागिने नेहमी मऊ सुती कपड्यात बांधून वेगळे ठेवा.

■ दागिने साफ करताना लहान मुलांचा ब्रश वापरा. लिक्विड डिटर्जंट सोप वापरूनही तुम्ही दागिने साफ करू शकता. पण या ब्रशने ते साफ करताना हळूवारपणे ब्रश फिरेल याची काळजी घ्या.

■ दागिने वापरून झाले की कापसाच्या बोळ्याने किंवा कपड्याने ते पुसून घ्या आणि कोरडे करून झाल्यानंतरच ते बॉक्समध्ये भरून ठेवा.

---

# आल्याचे पाणी प्या आणि दिवसभर फ्रेश राहा; आल्याच्या पाण्याचे फायदे



आल्याचं सेवन आरोग्यासाठी लाभदायक ठरते. आल्यामध्ये ॲन्टी इंफ्लेमेट्री, ॲन्टी बॅक्टेरियल, ॲन्टी ऑक्सिडेंटशिवाय आणखीही काही पोषक तत्त्वे असतात. आल्यामधील या पोषक तत्त्वांमुळे सूज कमी करण्यास तसेच सर्दी-खोकला कमी करण्यास फायदेशीर ठरते.

सकाळी उठल्यावर रिकाम्यापोटी आल्याचं पाणी पिण्याने संपूर्ण दिवस उत्साही, ताजेतवाने राहण्यास मदत होते. आल्याचे पाणी पिण्याने रोगप्रतिकार शक्तीही चांगली होती. पित्त झाल्यासही आल्याचं पाणी पिण्याने आराम मिळतो.

**पचनक्रिया सुधारते**

आलं रात्रभर पाण्यात भिजत ठेवून सकाळी उठल्यावर ते पाणी प्यायल्याने पचनक्रिया उत्तम राहते. अपचन होण्याची समस्या कमी होते. सकाळी उठल्यावर होणाऱ्या सिकनेसची समस्याही दूर होते. तसेच फ्रेश वाटते.

**त्वचा आणि केसांसाठी उपयोगी**

आल्याच्या पाण्यात ॲन्टीऑक्सिडेंट मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे केस आणि त्वचेला याचा फायदा होतो. तसेच योग्य प्रमाणात सी व्हिटॅमिन आणि ए व्हिटॅमिनही मिळते. सी, ए व्हिटॅमिनमुळे केस आणि त्वचेला आवश्यक पोषण मिळते.

**वजन कमी होते**

आल्याचं पाणी पिण्याने खाण्याची इच्छा कमी होते. तसेच शरीरात असलेले अधिक फॅट कमी करण्यासही मदत होते. आल्याचं पाणी शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाणही नियंत्रणात ठेवते.

---

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**
**मुख्य कार्यालय - विरार**
**दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३**

**जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१२४१/२४-२५**

**दिनांक :- ०२/०९/२०२४**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदभार्ने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-७ | NL३०/३७९/७३ | २०९० | साई क्रिस्टल बिल्डर्स | किस्मतुन मराताक शेख |
| २ | निळेमोरे-७ | NL३०/१८९/९ | २२२७ | किसन आर पेडणेकर / आदिती पेडणेकर | मंगेश चंद्रसेन कावले |
| ३ | निळेमोरे-७ | NL३०/२७९/२२ | २२२३ | साई डेव्ह. | समीधा संदेश करमळकर / संदेश हरिश्वर करकळकर |
| ४ | निळेमोरे-७ | NL३०/३०८/१९ | २१९७ | चंद्रकांत केशव सावंत | केतन जयवंत भडवळकर |
| ५ | निळेमोरे-५ | NL२८/९०/२१४ | २१६० | मे श्रीराम बिल्डर्स | शिवशंकर रामप्रसाद वर्मा / आशा शिवशंकर वर्मा |
| ६ | निळेमोरे-५ | NL२८/५८/१८ | २२३५ | एस. जी. मारगुड | सदानंद गैरहरी माजी / सरमा सदानंद माजी |
| ७ | निळेमोरे-५ | NL२८/१५/२५ | २२५८ | संदिप कृष्णाजी चौडणकर | योगीनी योगेश पिलके / योगेश गणपत पिलके |
| ८ | निळेमोरे-५ | NL२८/८०/३१ | २२८२ | रायनापाटी कनका नाजराज | अन्सी जॉस जीर्ज |
| ९ | निळेमोरे-५ | NL२८/५६/१८ | २२०७ | रोशनी प्रभाकर कदम | शर्वरी सुरेश सावंत |
| १० | निळेमोरे-५ | NL२८/५५/१७ | २३८७ | आल्बर्ट आगुस्तीन रॉड्रीग्ज | संजय सुर्यकांत दूबे |
| ११ | निळेमोरे-५ | NL२८/११०/४२ | २४०५ | मोहसिन राऊत | तारिकुत दूशकुडे लोगदे व मईना तरिकुछ लोकदे |
| १२ | निळेमोरे-५ | NL२८/६८/१४ | २३२४ | नारायण तुकाराम मोरे / शकुंतला मोरे | निलोफेर अब्दुलकरीम लखानी |
| १३ | निळेमोरे-५ | NL२८/९०/१६५ | २३२८ | अभिषेक कुमार | राजेश मधुसुदन साळवी / मानसी राजेश साळवी |
| १४ | निळेमोरे-५ | NL२८/२०/६ | २३२० | गोपवानी | ओमप्रकाश वेचन यादव / बबीता ओमप्रकाश यादव |
| १५ | निळेमोरे-५ | NL२८/१२/६६ | २४८१ | मर्चंट एस पी | स्वपन कुमार बेरा व बसंती स्वपन बेरा |
| १६ | निळेमोरे-५ | NL२८/२५/२ | २३७८ | एम वी संगप्पा | सर्वजीत कुमार सिंह |
| १७ | निळेमोरे-५ | NL२८/१०९/४० | २०९२ | टोपाझ होम्स | चादणी केतन खैर |
| १८ | निळेमोरे-६ | NL२९/२३४/१ | २४३६ | उल्हास आनंदजी रांभीया | सोनल प्रविन गोहील / जतीन प्रविन गोहील |
| १९ | निळेमोरे-६ | NL२९/१९६/७३ | २०९६ | श्रीनाथ रियलटर्स | मनोज नथुराम शर्मा / कसुम मनोज शर्मा |
| २० | निळेमोरे६ | NL२९/२५/४ | २२९३ | रामशंकर सिंग | साजीद सुलेमान पठान / हसीना साजीद पठान |
| २१ | निळेमोरे-१२ | NL२१/१४४/९०/१ | २७०१ | पुष्पा संजय गुप्ता | संजय मैनेजर गुप्ता |
| २२ | निळेमोरे-७ | NL३०/३३०/३२ | २७०० | एम. कफिलुर रहमान | मनोजकुमार सिंह व मनिलाल सिंह |

**सही/-**
**(संतोष पाटील)**
**सहाय्यक आयुक्त**
**प्रभाग समिती (ई) नालासोपारा**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com